Demarcation Land order

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई -५१
Ph. 6556799,6550111 F.x : 6556805 email address :- collrmsd@yahoo.com

**वाचले :-** १) नगर भूमापन अधिकारी, मुलुंड यांनी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर यांचेकडे सादर केलेला अहवाल क्र.न.भू.अ.मुलुंड/कांजूर/न.भू.क्र. ३५१, ५७५/११ दिनांक २९/०९/२०११, ३१/१०/२०१२

२) जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांनी या कार्यालयात सादर केलेला प्रस्ताव क्र न.भू.सं.३ क/कांजूर /क्षे.दु./एस.आर १३२८/२०१२ दिनांक २९/१२/२०१२

क्र. जि.अ.भू.अ./ ३ क/ क्षे.दु./एस आर १३२८/२०१३
दिनांक :- 2 /08/२०१३ /2907

## आदेश

नगर भूमापन कांजूर, तालुका कुर्ला येथील न.भू.क्र.३५१, ३५१/१ ते ११०, ५७५, ५७५/१ ते ९ या मिळकतींची सिमांकन मोजणी करुन येणाऱ्या क्षेत्राचा नगर भूमापन क्रमांक निहाय तपशिल अंकी व अक्षरीमध्ये नमुद करुन टिपांसह मोजणी नकाशाच्या साक्षांकित प्रती पाठविणेकामी नगर भूमापन अधिकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी त्यांचेकडील जा.क्र. झो.पु.प्रा./न.भू./कार्या-१/टे-१/शिवदर्शन / सिमांकन /२०११ दिनांक २८/०४/२०११ रोजीचे पत्रान्वये नगर भूमापन अधिकारी मुलुंड यांना कळविलेले आहेत. त्यानुसार संबंधीतांकडून होणारी मोजणी फी भरणा करुन घेऊन मो.र.नं. ६६४/२०११ दिनांक २३/०६/२०११ अन्वये दिनांक ०७/०७/२०११ रोजी परिरक्षण भूमापक यांनी टोटल स्टेशन मशिनने मोजणी कामी केलेले आहे. मोजणीअंती न.भू.क्र. ३५१ व ५७५/८ या मिळकतीत क्षेत्र दुरुस्ती संभवत असलेने नगर भूमापन अधिकारी, मुलुंड यांनी दिनांक २९/०९/२०११, ३१/१०/२०१२ रोजी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १०६अन्वये अहवाल सादर केलेला आहे.

### न.भू.क्र. ३५१ चे मिळकतीबाबत

न.भू.क्र. ३५१ चे मिळकत पत्रिकेवर क्षेत्र २०६०.४ चौ.मी. व उपमिळकती न.भू.क्र. ३५१/१ ते ११० चे क्षेत्र ११८२.३ चौ.मी. असे एकूण ३२४२.७ चौ.मी., हक्काचा मूळ धारक सदरी श्रीमती रिटा फिलीप डिमेलो यांचे नांव व सत्ता प्रकार "क" नमुद आहे.

नगर भूमापन कांजूर न.भू.क्र. ३५१ चा चालता नंबर ५९३ चे मूळ टिपण, वसलेवार उपलब्ध झालेले असून सदर टिपणांची आकृती सोडवून नकाशा तयार केला असता तो मूळ आलेख क्र.४७ मधील न.भू.क्र.३५१ च्या हद्दीशी जुजबी फरकाने मेळात आहे. तसेच न.भू.क्र. ३५१ ची सनद उपलब्ध झालेली असून सनदेवरील न.भू.क्र. ३५१ च्या हद्दी हया चा.नं. ५९३ चे टिपण सोडवून तयार झालेल्या नकाशाच्या हद्दीशी मेळात आहेत.

न.भू.क्र. ३५१ चा.नं. ५९३ चे वसलेवार तपासले असता एकूण १ ते २५ वसले असून त्यांची बेरीज ३७२३.५ मधून चा.नं. ८४ ते १४७, १५२ ते १७१, ४२० ते ४३६, ४३८ ते ४४७, ७२, ५९२ चे क्षेत्र १६६३.१ चौ.मी. वजा जाता चा.नं. ५९३ चे क्षेत्र २०६०.४ चौ.मी. कायम केलेले आहे. व तेच क्षेत्र मिळकत पत्रिकेवर व चौकशी नोंदवहीत दाखल आहे.

चा.नं. ५९३ चे वसलेवार तपासले असता वसला नंबर २,५,१३, १६,१८,१९ मध्ये गणितीय चुक दिसून येते त्याबाबतची वस्तुस्थिती पुढील प्रमाणे.

१) वसला नंबर २ ची लांबी ४४.५०, रुंदी निम्मे १७.२५ चा गुणाकार **७६७.६२५ चौ.मी.** येत असताना ७६७.१२५० चौ.मी. असा सदोष नमुद केलेला आहे.

२) वसला नंबर ५ ची एकूण लांबी २.० + १ .०+२.० =५.० येत असताना १.०+२.०=३.० अशी सदोष नमुद केलेली असलेने गुणाकार **२८.७५ चौ.मी.** ऐवजी १७.२५ असा चुकीचा नमुद केलेला आहे.

३) वसला नंबर १३ मधील लांबी २०.०, रुंदी निम्मे १८.५० चा गुणाकार **३७०.०चौ.मी.** येत असताना ३६९.० असा सदोष नमुद केलेला आहे.

४) वसला नंबर १६ मधील एकूण लांबी ५९.७५, रुंदी निम्मे १२.५० चा गुणाकार **७४६.८७५चौ.मी.** येत असताना १२१.८७५ असा सदोष नमुद केलेला आहे.

५) वसला नंबर १८ मधील एकूण लांबी १८.५०, रुंदी निम्मे ८.० चा गुणाकार **१४८.० चौ.मी.** येत असताना १५३.० असा सदोष नमुद केलेला आहे.

६) वसला नंबर १९ मधील लांबी २.५० एकूण रुंदी २९.५० चे निम्मे १४.७५ येत असताना १३.७५ प्रमाणे गुणाकार ३४.३७५ चौ.मी. असा सदोष केलेला आहे. त्याऐवजी **३६.८७५ चौ.मी.** असा नमुद करणे आवश्यक होते.

उपरोक्त वसला नंबर २, ५, १३,१६,१८ व१९ मधील अंक गणितीय चुक दुरुस्तीअंती वसला नंबर १ ते २५ ची बेरीज ३७२३.५ चौ.मी. ऐवजी ४३५९.० चौ.मी.इतकी येत आहे. त्यामधून उपमिळकती चा.नं. ८४ ते १४७,१५२ ते १७१, ४२० ते ४३६, ४३८ ते ४४७, ७२, ५९२ (न.भू.क्र.३५१/१ ते ११०,३५२) चे प्रत्यक्ष येणारे क्षेत्र १८९०.४ चौ.मी.वजा जाता न.भू.क्र.३५१ चे मिळकत पत्रिकेवर दाखल असलेले क्षेत्र २०६०.४ चौ.मी. ऐवजी २४६८.६ चौ.मी. इतके कायम होत आहे. व त्यावेळी सदर क्षेत्र मिळकत पत्रिकेवर दाखल करणे आवश्यक होते.

मो.र.नं. ६६४/११ चे मोजणीअंती न.भू.क्र. ३५१, ३५१/१ ते ११० चे नव्याने वसलेवाराने एकसंघ क्षेत्र काढले असता ते ३६५०.९ चौ. मी. इतके येत असून त्या क्षेत्रातून पोटातील उपमिळकती न.भू.क्र. ३५१/१ ते ११० चे क्षेत्र ११८२.३ चौ.मी. वजा जाता न.भू.क्र. ३५१ चे क्षेत्र **२४६८.६ चौ.मी.** कायम होत आहे.

**न.भू.क्र.५७५/८ चे मिळकतीबाबत**

न.भू.क्र. ५७५/८ चे मिळकत पत्रिकेवर क्षेत्र ७००.८ चौ.मी., सत्ता प्रकार "क" व धारक सदरी दिनांक २९/०८/७४ चे नोंदीने टिळकचंद मंगतराम वगैरे -३ यांची नांवे दाखल आहेत.

न.भू.क्र. ५७५/८ यास चा.नं. ४१० असा असून त्याचे मूळ टिपणातील नमुद मापांचे आधारे आकृती सोडवून तयार होणाऱ्या आकृतीची मूळ आलेखातील आकृतीशी तसेच सनदेशी पडताळणी करता हद्दी मेळाशी आहेत. मूळ वसलेवार पहाता एकूण १ ते ७ वसल्यांची बेरीज ७५८.४ चौ.मी. नमुद करुन त्यामधून उपमिळकती चा.नं. ७१, १७३ ते १७५, ५९८,५९९ (न.भू.क्र. ५७५/२ ते ७) चे क्षेत्र ५७.६ चौ.मी. वजा करुन चा.नं. ४१० चे क्षेत्र ७००.८ चौ.मी. कायम केलेले आहे. व ते क्षेत्र न.भू.क्र. ५७५/८ चे मिळकत पत्रिकेवर दाखल आहेत. परंतु नकाशा पहाता न.भू.क्र.५७५/८ चे पोटात न.भू.क्र. ५७५/२ ते ७ व ९ असून वसलेवारातून मात्र न.भू.क्र. ५७५/२ ते ७ चे क्षेत्र ५७.६ चौ.मी. वजा केलेले आहे. परंतु पोटातील मिळकत न.भू.क्र. ५७५/९ चे क्षेत्र ४७.२ चौ.मी. हे वजा करणेचे राहून गेलेले असून ते क्षेत्र वजा जाता न.भू.क्र. ५७५/८ चे क्षेत्र ६५३.६ चौ.मी. कायम होत आहे.

तसेच न.भू.क्र. ५७५/८ चे पोटातील उपमिळकती न.भू.क्र. ५७५/२ ते ७ व ९ चे एकसंघ नव्याने क्षेत्र काढले असता ते ७५८.४ चौ.मी. इतके येते. त्यामधून पोटातील उपमिळकतीचे क्षेत्र १०४.८ चौ.मी. वजा जाता न.भू.क्र. ५७५/८ चे क्षेत्र **६५३.६ चौ.मी.** कायम होत आहे.

न.भू.क्र. ३५१ व ५७५/८ चे अंक गणितीय चुक दुरुस्तीअंती येणारे क्षेत्र हे मोजणीअंती येणाऱ्या प्रस्तावित क्षेत्राशी मेळाचे आहे.

न.भू.क्र. ३५१ चे पोटातील उपमिळकती न.भू.क्र. ३५१/१ ते ११० व न.भू.क्र. ५७५/८ चे पोटातील न.भू.क्र. ५७५/२ ते ७ व ९ या उपमिळकतीचे तसेच लगत मिळकतीचे क्षेत्रात/हद्दीत कोणताही बदल होत नाही. न.भू.क्र. ३५१ व ५७५/८ चे क्षेत्र दुरुस्ती मुळे नगर भूमापनाचे हद्दीत कोणताही बदल होत नाही.

नगर भूमापन कांजूर तालुका कुर्ला येथील न.भू.क्र. ३५१ चे मिळकत पत्रिकेवर सदोष दाखल असलेले २०६०.४ चौ.मी.ऐवजी २४६८.६ चौ.मी. तसेच न.भू.क्र. ५७५/८ चे मिळकत पत्रिकेवर दाखल असलेले क्षेत्र ७००.८ चौ.मी. ऐवजी ६५३.६ चौ.मी. अशी अंक गणितीय चुक दुरुस्तीअंती येणारे क्षेत्र

कायम करणेकामी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १०६ अन्वये क्षेत्र दुरुस्तीस मान्यता मिळून त्याप्रमाणे अभिलेखात अंमल होणेकामी आदेश पारीत होणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील प्रस्तावावर चौकशी करणेकामी सर्व संबंधीतांना आगाऊ नोटीसा देऊन दिनांक १७/०५/२०१३ रोजी सुनावणी ठेवणेत आली होती. सुनावणीस श्रीमती रिटा फिलीप डिमेलो, श्री.टिळकचंद मंगतराम वगैरे-३ यांचे वतीने श्री.धीरज अग्रवाल हजर. नगर भूमापन अधिकारी मुलुंड यांचे कार्यालयातील परिरक्षण भूमापक श्री.बी.एस.बनसोडे हजर होते. प्रकरणी मोजणीअंती आलेले क्षेत्र दुरुस्त करणेस अर्जदार यांची हरकत नसलेने प्रकरण आदेशासाठी बंद करणेत आले.

न.भू.क्र. ५७५/८ चे मिळकत पत्रिकेवरील धारक श्री.टिळकचंद मंगतराम वगैरे-३ यांचे वतीने श्रीमती संजना विग यांनी क्षेत्र दुरुस्तीबाबतची नोटीस स्विकारलेली असून त्यांनी सुनावणी दिवशी दस्त क्र. बदर-७/२७८९/२०१० ची मुखत्यार पत्राची छायांकित प्रत सादर केलेली आहे. सदरचे मुखत्यार पत्र हे त्यांनी श्री.धीरज कृष्णा अग्रवाल यांना दिलेले आहे. तसेच न.भू.क्र. ३५१ चे मिळकत पत्रिकेवरील मूळ धारक श्रीमती रिटा फिलीप डिमेलो यांचे वतीने एरिक निकोलस डिमेलो वगैरे-१६ यांनी दस्त क्र. बदर - ३/४५१०/२००८ अन्वये मेसर्स स्पेस डेव्हलपर्स यांना मुखत्यार पत्र लिहून दिलेले आहेत.

नगर भूमापन कांजूर, तालुका कुर्ला येथील न.भू.क्र. ३५१,५७५/८ चे प्रकरणी प्रस्तावित केलेले क्षेत्र बिनचूक असल्याची खात्री जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांनी केली आहे.सबब प्रत्यक्ष मोजणीअंती येणाऱ्या क्षेत्र दुरुस्तीस मान्यता देण्यास हरकत नाही.

सबब मी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १०६ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन असा **आदेश** देतो की, नगर भूमापन कांजूर तालुका कुर्ला येथील खाली नमुद केलेल्या मिळकतीचे मिळकत पत्रिकेवर दाखल असलेले स्तंभ क्र.३ मधील क्षेत्र रद्द करुन त्याऐवजी स्तंभ क्र. ४ मध्ये नमुद केलेले क्षेत्र दाखल करावे.

| गांव / तालुका | न.भू.क. | मिळकत पत्रिकेवर दाखल असलेले क्षेत्र चौ.मि. | जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांनी प्रस्तावित केलेले क्षेत्र चौ.मि. | तफावतीचे कारण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| कांजूर/ कुर्ला | ३५१ | २०६०.४ | २४६८.६ | अंक गणितीय चुक दुरुस्तीअंती येणारे क्षेत्र कायम. |
| | ५७५/८ | ७००.८ | ६५३.६ | |

सही/-
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,
मुख्य प्रवर्तक
शिवदर्शन एस.आर.ए.सहकारी गृह. संस्था (मर्या.)
कुवारी रोड, मंगतराम पेट्रोल पंपाच्या मागे,
भांडूप (प), मुंबई -४०० ०७८.
प्रत - जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.
प्रत - नगर भूमापन अधिकारी, मुलुंड यांचेकडे माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.
२/- सोबत मोजणी मो.र.नं. ६६४/२०११ ची धारीका पानांक १ ते ४५७ असे.

निर्गमित

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

D:\Desktop\Salunkhe\Ekavade\06-135\Kanjur CTS no 351.doc